MHAU050027362018

**निशाणी क्रमांक ११४ खालील आदेश**

(१० जुलै, २०२४)

महिला नामे मंगलाबाई सुभाषचंद्र बोथ्रा हिला प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्यात यावे या मागणीसाठी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिते मधील तरतुद आदेश १ नियम १० (२) या अन्वये वादीने दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्ज कथन की, प्रस्तुतचा दावा हा वाद मिळकतीचे वाटप होऊन प्रत्यक्ष कब्जा मिळावा या मागणीसाठी तिने दाखल केलेला आहे. प्रकरणात दि. ०४.११.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१४ याने त्याची सुधारीत कैफीयत दाखल केलेली असून सदर कैफीयत कथन वाचल्यानंतर प्रतिवादी क्र.१३ ने वाद मिळकत ही सन २०१३ साली महिला नामे मंगलबाई सुभाष बोथ्रा हिस विक्री केलेली आहे ही बाब वादीचे लक्षात येऊन त्याची तिला माहिती झाली आहे. सदरहू खरेदीदार ही प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार असून तिला प्रतिवादी म्हणून दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करणे वादीस क्रमप्राप्त झाले आहे. नसता तांत्रीक मुदयांवर, वादीचा दावा खारीज होऊ शकतो, त्यातुन तिचे पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे. दावा मिळकत खरेदी करणारी महिला पक्षकार म्हणून समाविष्ट झाल्यास दाव्याचा निकाल गुण दोषावर होण्यास त्याची मदत होणार आहे. तरी अर्ज मागणी प्रमाणे तो मंजुर करण्यात यावा व महिला नामे मंगलाबाई सुभाष बोथ्रा हिला प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्यात यावे अशी विनंती वादीकडुन प्रस्तुत अर्जात करण्यात आलेली आहे.

३. प्रतिवादी क्र.१४ कडुन म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्ज मागणीस प्रखर विरोध दर्शविलेला आहे. सदर प्रतिवादीचे म्हणणे की, प्रस्तुत प्रकरणात वादी हिने पुरावा सादर केला असून वादीचा उलटतपास घेण्यास प्रतिवादी सतत हजर आहे. प्रस्तुतचा अर्ज कालबाहय व मुदबाहय असल्यामुळे दाव्याच्या सद्यास्थितीत तो विचारात घेता येणार नाही.

तसेच अर्ज परिच्छेद क्र.२ मध्ये चुकीचे व जाणीवपूर्वक दिशाभुल करणारे कथन वादी ही करत असून ते तिच्या दाखल कागदपत्राशी विसंगत असे आहे. प्रतिवादी क्र.१४ ने न्यायालयात नि.क्र.५३ वर २१.११.२०१६ रोजी लेखी जबाब दाखल करुन सदर लेखी जबाबातील परिच्छेद क्र. ३१ मध्ये यापूर्वीच दाव्यातील मिळकत ही महिला नामे मंगलाबाई सुभाष बोथ्रा हिला नोंदणीकृत खरेदीखताव्दारे विक्री करण्यात आलेली आहे असे स्पष्ट पक्षकथन कैफीयतीमध्ये नमुद केलेले आहे. सदर बाब विचारात घेता वादी हिने अर्जात खोटे कथन केले आहे हे स्पष्ट होते. केवळ प्रकरण लांबणीवर टाकण्याचा हेतु वादीचा असल्यामुळे तिचेवर रक्कम रु. १०,०००/– खर्च लादून प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा, असे म्हणणे प्रतिवादी क्र. १४ ने मांडलेले आहे.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. अर्ज मागणीचे समर्थन करण्यासाठी वादीचे वतीने विधिज्ञांकडुन खालील प्रकरणातील निवाडयांचा दाखला देऊन त्याचा आधार घेतलेला आहे.

**१. सुमीत्रा आण्णा आवारे व इतर विरुध्द अनुसया राजाराम आवारे व इतर २०१२ (३) ऑल एम.आर. ९१६.**

**२. श्रीमती. मावेल रीव्हज विरुध्द कॉन्फेरेरा दी इजरेजा दी कॉरटेलम व इतर २०१५ (६) ऑल एम.आर. १६७**

**३. श्रीमती. सुशिल कौर भ्र. सुखबिरसिंग छाटवल व इतर विरुध्द मे. औरंगाबाद जिनिंग ऐड प्रेसिंग फॅक्ट्री व इतर २०१२ (१) ऑल एम.आर १८७**

**४. संजय वर्मा विरुध्द माणिक रॉय व इतर २००७ (१) महा. एल. आर. ७८४ (एस.सी.)**

**५. एस.आर. अहेमद मार्फत वारस विरुध्द श्रीमती अलिमा बेगम भ्र. सय्यद गुलामजिलानी व इतर २००९ (४) महा. एल.आर. २८५**

**६. रामकुमार विरुध्द उत्तरप्रदेश व इतर २०२२ (४) सी.सी.सी. १६७ (एस.सी.)**

**७. मोरेश्वर यादवराव महाजन विरुध्द व्यंकटेश सिताराम भिडे मार्फत व इतर २०२२ (४)सी.सी.सी. १७२ एस. सी.**

**८. धनलक्ष्मी व इतर विरुध्द पी मोहन व इतर २००७ (२) बी.सी.जे. ३०९ एस.सी.**

**९. मधुकर व्यंकटेश उलाल विरुध्द अनिता डिसुजा व इतर २००६ (२) एम.एच. एल.जे.**

**१०. अमितकुमार शा व इतर विरुध्द फरीदा खतुन व इतर २००५ (२) बी.सी.जे.७४० एस.सी.**

६. याउलट प्रस्तुतचा अर्ज हा कायदयाने विचारात घेता येणार नाही व तो फेटाळण्यास पात्र आहे याचे समर्थन करण्यासाठी प्रतिवादीच्या विधिज्ञाकडुन **श्री. के. जयराम व इतर विरुध्द बॅग्लोर डेव्हलपमेंट ऑथोरेटी, सिव्हील अपिल नं. ७५५०–७५५३/२०२१, एस. पी. चंगलवरय्या नायडू विरुध्द जगन्नाथ १९९४ ए.आय.आर. ८५३ एस.सी.सी. (१) १ एस.सी.** तसेच **मुंबई इंटरनॅशलन एअरपोर्ट विरुध्द रेगन्सी कन्व्हेंशन सेंटर ऍंड हॉटेल्स प्रा. ली. व इतर ए.आय.आर. २०१० एस.सी. ३१०९**, या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाडयाचा आधार घेतलेला आहे.

७. अर्जकथन व त्यावरील म्हणणे याचे बारकाईने वाचन केले. तसेच उभयपक्षांकडुन युक्तीवादात उपस्थित करण्यात आलेले मुददे विचारात घेतले. तसेच उभयपक्षांकडुन दाखले खातर दाखल करण्यात आलेले निर्णयविधी यांचे बारकाईने वाचन करुन त्यात मा. सर्वोच्च व उच्च न्यायालय यांनी नोंदविलेले निरीक्षण विचारात घेऊन प्रस्तुत प्रकरणाचे कागदपत्र तपासले. प्रस्तुतचा दावा हा वादी हिने दि. २९.०४.१९९९ रोजी दाखल केलेला असून त्यात एकूण १२ इसम प्रतिवादी म्हणून समाविष्ट केलेले आहेत. तसेच अर्ज नि.क्र. ३३ वरील आदेशान्वये यापूर्वी वादीने दाव्यात दुरुस्ती केलेली दिसून येत असून त्यानुसार प्रतिवादी क्र. १३ व १४ यांना नव्याने समाविष्ट केलेले आहे. तसेच प्रकरणात नि.क्र.५३ वर दि. २१.११.२०१६ रोजी कैफीयत दाखल केलेली असून त्याचे बारकाईने अवलोकन करता त्यातील परिच्छेद क्र. ३० मध्ये महिला नामे मंगलाबाई सुभाषचंद्र बोथ्रा हिस वाद मिळकत विक्री केलेली आहे असे स्पष्ट कैफीयत कथन केलेले दिसून येत आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणात नि.क्र.६४ वर निश्चित करण्यात आलेले मुददे विचारात घेता प्रथमतः दि. १७.०१.२०१२ रोजी वादप्रश्न निश्चित करण्यात आलेले असून त्यानंतर प्रतिवादी क्र. १४ चे नि.क्र. ५३ वरील कैफीयतीच्या कथनाचे अनुषंगाने दि. २२.११.२०१६ रोजी अतिरीक्त वादप्रश्न क्र. १५ व १६ असे दाव्यात निश्चित करण्यात अलेले आहेत. तसेच नि.क्र. ९० वरील तडजोड पाहता वादीने प्रतिवादी क्र. ४ ते १२ यांचेविरुध्द दाव्यातील मागणी बिनशर्थ माघारी घेतलेली आहे. तसेच नि.क्र. ५६ वरील पुरसिस विचारात घेता काही क्षेत्रापुरता दावा चालवणे नाही असे निवेदन केलेले आहे. तसेच दाव्यात वादीने पहिले सरतपासाचे शपथपत्र दि. ०८.११.२०११ रोजी दाखल केलेले

आहे. तसेच वादीतर्फे साक्षीदार क्र. १ चे पुरावा शपथपत्र नि.क्र.१०९ वर दि. २९.०८.२०२३ रोजी दाखल केलेले असून प्रकरण वादीचे साक्षीदाराचे उलटतपासाकरीता नेमण्यात आलेले होते असेही प्रकरणाचा आढावा घेता अढळ होत आहे. तसेच प्रस्तुतचा दावा लवकरातलवकर निकाली काढावा अशा मागणीचा अर्ज प्रतिवादी क्र. १४ कडुन दि. १३.०७.२०२३ रोजी दाखल झालेला असून त्यावर वादीकडुन म्हणणे दाखल झालेले नाही.

८. वरील उल्लेखलेल्या बाबींचा सारासार विचार करुन प्रस्तुत प्रकरणाची स्टेज विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज हा वादीच्या साक्षीदाराच्या उलटतपासाकरीता प्रकरण नेमण्यात आल्यानंतर वादीने सादर केलेला दिसून येत आहे. तसेच प्रकरणातील घटना व परिस्थितीचा आढावा घेता प्रस्तुतचा अर्ज हा आठ वर्षाच्या विलंबानंतर वादीकडुन दाखल करण्यात आलेला आहे असे दिसून येत आहे. विलंबाबाबत प्रस्तुत अर्जात कोणताही संयुक्तीक खुलासा अगर स्पष्टीकरण वादीकडुन अर्जात केलेले दिसून येत नाही. तसेच वादी ज्या महिलेस पक्षकार म्हणून सामील करु इच्छीते, त्याबाबतची माहिती वादीस सन २०१६ मध्येच झालेली होती असेही स्पष्टपणे दिसून येते. असे असतांना प्रस्तुतचे अर्जात त्याबाबत काहीएक निवेदन वादी कडुन नमुद केलेले दिसून येत नाही, वरील बाबीतुन वादीचा प्रामाणीकपणा दिसून येत नाही. तसेच वादीकडुन अर्ज दाखल करण्यास सतर्कता का दाखवली गेली नव्हती व नाही याबाबतही प्रमाणीक खुलासा वादीचे अर्जात दिसून येत नाही.

९. **सुमित्रा आवारे व इतर विरुध्द अनुसया आवारे व इतर २०१२(३) ऑल.एम.आर. ९१६** मा. उच्च न्यायालय बॉम्बे यांचेकडुन करण्यात आलेल्या निवाडयामधील प्रकरणाची पार्श्वभुमी विचारात घेता सख्या बहिणीच्या अधिकाराबाबत वाटणीच्या दाव्यामध्ये सदरचा अर्ज बहिणीकडुन दाखल झालेला होता. तथापि प्रस्तुत दाव्यात तशी वस्तुस्थिती नाही. **श्रीमती. माबेल रीव्हज विरुध्द कॉन्फेरेरा दी इजरेजा दी कॉरटेलम व इतर २०१५(६) ऑल एम.आर. १६७** या प्रकरणात मा. उच्च न्यायालय बॉम्बे खंडपीठ पणजी यांच्याकडुन देण्यात आलेल्या निवाडयातील प्रकरणाची पार्श्वभुमी विचारात घेता सदर वादीने प्रतिवादीच्या नावाचा उल्लेख कौटूंबिक पार्श्वभुमी मध्ये दाव्यामध्ये केलेला होता, त्या कारणावरुन मा. उच्च न्यायालयाकडुन तो अर्ज मंजुर करण्यात आलेला होता. तशी परिस्थिती प्रस्तुत प्रकरणात नाही. **श्रीमती. सुशिल कौर भ्र. सुखबिरसिंग छाटवल व इतर विरुध्द मे. औरंगाबाद जिनिंग ऐड प्रेसिंग फॅक्ट्री व इतर २०१२ (१) ऑल एम.आर**

**१८७, मधुकर व्यंकटेश उलाल विरुध्द अनिता डिसुजा व इतर २००६ (२) एम.एच. एल.जे.** या प्रकरणात मा. उच्च न्यायालय बॉम्बे व खंडपीठ औरंगाबाद यांच्या निवाडयाचे बारकाईने वाचन करता सदर निवाडयातील केसची पार्श्वभुमी ही प्रस्तुत प्रकरणात अंतर्भुत असलेल्या पार्श्वभुमी ही अगदी भिन्न आहे.

१०. तसेच **संजय वर्मा विरुध्द माणिक रॉय व इतर २००७ (१) महा. एल. आर. ७८४ (एस.सी.), रामकुमार विरुध्द उत्तरप्रदेश २०२२ (४) सी.सी.सी. १६७ (एस.सी.)** या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालय यांच्याकडुन करण्यात आलेल्या निवाडयाचे बारकाईने वाचन करता सदरहू निवाडयातील अंतर्भुत असलेला विषय हा प्रस्तुत अर्जातील अंतर्भुत असलेल्या विषयापेक्षा अगदी वेगळा असा असून प्रस्तुत दाव्यातील वस्तुस्थिती ही अगदी भिन्न आहे. **एस.आर. अहेमद मार्फत वारस विरुध्द श्रीमती अलिमा बेगम भ्र. सय्यद गुलामजिलानी व इतर २००९ (४) महा. एल.आर. २८५** या प्रकरणात मा. उच्च न्यायालय बॉम्बे खंडपीठ नागपुर यांच्याकडुन करण्यात आलेल्या निवाडयातील प्रकरणाची पार्श्वभुमी व अंतर्भुत असलेला वाद विषय याचे अवलोकन करता ते एकमेकांपासून अगदी भिन्न आहे.

११. तसेच **मोरेश्वर यादवराव महाजन विरुध्द व्यंकटेश सिताराम भिडे मार्फत व इतर २०२२(४) सी.सी.सी. १७२ एस. सी.,धनलक्ष्मी व इतर विरुध्द पी मोहन व इतर २००७ (२) बी.सी.जे. ३०९ एस.सी.** या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालय यांच्याकडुन करण्यात आलेल्या निवाडयांचे बारकाईने वाचन करता सरहू निवाडयातील अंतर्भुत असलेला वाद विषय हा प्रस्तुत प्रकरणात व अर्जात अंतर्भुत असलेला वाद विषया या पेक्षा अगदी वेगळा असा असून प्रस्तुत दाव्यातील वस्तुस्थिती ही देखील अगदी भिन्न आहे. सबब, सदरहू निवाडे वादीचे केसला लागु होत नाही. **अमितकुमार शा व इतर विरुध्द फरीदा खतुन व इतर २००५ (२) बी.सी.जे.७४० एस.सी.** या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाकडुन करण्यात आलेल्या निवाडयाचे वाचन करता सदर प्रकरणात सादर केलेल्या अर्जामध्ये विलंबाचे कारण हे संयुक्तीक होते, तसेच त्याबाबत स्पष्टीकरण करण्यात आलेले होते. तसेच अर्जातील स्पष्टीकरण हे समाधानकारक होते व ते चांगल्या हेतुने करण्यात आलेले होते. तथापि प्रस्तुत प्रकरणात वादीस सन २०१६ साली माहिती होऊन देखील तिचेकडुन पक्षकार सामील करण्यासाठी कोणतीही त्वरीत कारवाई अनुसरली गेली नसून आठ वर्षाच्या विलंबानंतर प्रस्तुतचा अर्ज वादीने सादर केलेला आहे. सबब, सदरहू निवाडयातील प्रकरणामधील पार्श्वभुमी व वस्तुस्थिती ही या न्यायालयासमोर असलेल्या प्रस्तुत

प्रकरणातील केसची पार्श्वभुमी व वस्तुस्थिती ही वेगवेगळी असल्याने सदरहू निवाडा हा वादीचे केसला लागु होत नाही.

१२. याउलट प्रतिवादी क्र. १४ च्या वतीने दाखल करण्यात आलेल्या **श्री. के. जयराम व इतर विरुध्द बॅग्लोर डेव्हलपमेंट ऑथोरेटी, सिव्हील अपिल नं. ७५५०–७५५३/२०२१, एस. पी. चंगलवरय्या नायडू विरुध्द जगन्नाथ १९९४ ए.आय.आर. ८५३ एस.सी.सी. (१) १ एस.सी.** तसेच **मुंबई इंटरनॅशलन एअरपोर्ट विरुध्द रेगन्सी कन्व्हेंशन सेंटर ऐंड हॉटेल्स प्रा. ली. व इतर ए.आय.आर. २०१० एस.सी. ३१०९**, या निवाडयांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलेले निरीक्षण विचारात घेऊन प्रस्तुत प्रकरणातील घटना व परिस्थितीचा सारासार विचार करता वादी ज्या प्रकरणातील न्यायनिवाडयाचा आधार अर्ज मागणीचे समर्थनार्थ घेत आहे, त्यातील पार्श्वभुमी, घटना व परिस्थिती ही प्रस्तुत प्रकरणातील घटना व परिस्थितीशी अगदी भिन्न व वेगवेगळया असल्याने सदरहू वर उल्लेखलेले विधीनिर्णय वादीच्या अर्ज मागणीस आधारभुत व सहाय्यभुत ठरत नाहीत या अंतिम निष्कर्षापर्यंत हे न्यायालय येऊन वादीचा प्रस्तुत अर्ज हा फेटाळण्यास लायक व पात्र आशाही अंतिम निष्कर्षाप्रत हे न्यायालय येऊन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

वादीचा अर्ज नि.क्र. ११४ वरील मागणी फेटाळण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2024.07.11 15:35:22 +0530

दिनांक – १०.०७.२०२४ (आर. एम. कराडे)
ठिकाण — वैजापूर. सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
**वैजापूर.**